**महाराष्ट्र शासन**
**प्राथमिक शिक्षण संचालनालय**
**डॉ.ॲनी बेझंट मार्ग, मध्यवर्ती इमारत,पुणे-४११००१.**
**दुरध्वनी : (०२०) २६१२५६९२** **ई-मेल depmah2@gmail.com**

जा.क्र./प्राशिसं/आरटीई-५२०/मु.वा/२०२१/ 1319 दिनांक : १९/०३/२०२१

19 MAR 2021

प्रति,

१) शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई, महानगरपालिका.
२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, सर्व.

**विषय :- सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षाच्या आर.टी.ई. २५ टक्के प्रवेश प्रक्रियेअंतर्गत पालकांना अर्ज करण्याची दिनांकास मुदतवाढ देणेबाबत.**

**संदर्भ :- शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचे पत्र क्र. जिपना/शिक्षण/प्राथ/आरटीईप्र/२२०९/२१ दिनांक १७/०३/२०२१**

उपरोक्त विषयाबाबत बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम १२ (१) (सी) नुसार खाजगी विनाअनुदानित शाळांमध्ये प्रवेश स्तरावर २५ टक्के जागा वंचित व दुर्बल घटकातील मुला/मुलींसाठी राखीव ठेवण्याची तरतूद आहे.

दरवर्षी प्रमाणे सन २०२१-२२ या वर्षांची आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन राबविण्यात येत असून सर्व जिल्हयातील आरटीई अंतर्गत २५ टक्के ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया चालु आहे.

सन २०२१-२२ या वर्षांची आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रियेकरिता सर्व जिल्हयातील आरटीई अंतर्गत पात्र असलेल्या ९४३२ शाळांनी ऑनलाईन रजिस्ट्रेशन केले आहे. सन २०२१-२२ या वर्षांची आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रियेकरिता पालकांना अर्ज करण्याकरीता दिनांक ०३/००३/२०२१ ते दिनांक २१/०३/२०२१ पर्यंत मुदत देण्यात आली होती. परंतु दिनांक ११/०३/२०२१ ते दिनांक १५/०३/२०१६ या कालावधीमध्ये OTP ची तांत्रिक अडचण आल्यामुळे पालकांना अर्ज भरता आले नाही. तरी, OTP ची तांत्रिक अडचण दूर झाली असून पालकांना अर्ज करण्यासाठी मुदतवाढवून देणेबाबत तक्रारी संचालनालयास प्राप्त होत आहेत तसेच काही जिल्हयांमध्ये कोरोणाचा प्रार्दुभाव लक्षात घेता लॉकडाऊन घोषित करण्यात आले आहे त्यामुळे सन २०२१-२२ या वर्षांची आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रियेकरिता पालकांना अर्ज करण्याकरीता दिनांक ०३/०३/२०२१ ते दिनांक ३०/०३/२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

19.03.21

**(द.गो.जगताप)**
शिक्षण संचालक (प्राथमिक)
शिक्षण संचालनालय, पुणे - १.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर :**
१. मा.अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे - १.



Scanned by CamScanner